# तुळशीचं लग्न- A Divine Anniversary Celebration @कँटन मराठी शाळा

दसरा-दिवाळी धुमधडाक्यात साजरी केल्यानंतर कँटन मराठी शाळेमधे एका खास लग्नाची चर्चा चालू झाली. सर्व शिक्षकांच्या एकाच meeting मधे १९ नोव्हेंबर २०२३ चा मुहूर्त ठरला पण आणि तुळशीच्या लग्नाची एकच लगबग चालू झाली. तुळस आणि कृष्णरूपी विष्णू चा विवाह थाटामाटात साजरा करायचं planning चालू झालं. एकच ध्यास होता की आपल्या मुलांना इथे सातासमुद्रापार तुळशीच्या लग्नाचा’ सोहळा उभा करायचा, अगदी आपण आपल्या लहानपणी आजी-आजोबांकडे साजरा केला तस्सा किंवा जरा सरसंच.

सर्व पालकांना Whatsapp वर एक खास पत्रिका पाठवून आग्रहाचं आमंत्रण देण्यात आलं आणि पंगतीला फराळाचा menu ठरवून, पालक-शिक्षकांच्या Teamने जबाबदारी वाटून घेतली. लग्नसोहळ्याची, पूजेची जय्यत तयारी केली होती. कँटन शाळेचा हॉल, झेंडूच्या माळा, वृंदावन, पणत्यांनी सुंदर सजवला होता.









सगळं वऱ्हाड जमल्यावर जोगदेव आज्जींनी बच्चेकंपनीला वृंदा, जालंधर आणि विष्णू-महेशाची गोष्ट सांगितली.
जालंधर-महेशाच्या युद्धामधे विष्णूंनी युक्ति करून वृंदेला कसं गुंतवून ठेवलं, मग वृंदेनी विष्णूला शाळिग्राम बनून युगानुयुगे नदीत पडून राहायचा शाप दिला आणि विष्णुंनी कृष्णरूपात जन्म घेऊन कसं त्यांचं वृंदेशी म्हणजे तुळशीशी लग्नाचं वचन पूर्ण केलं ह्याची रंजक कहाणी मुलांनाच काय पण जमलेल्या पालकांना पण आवडली. वृंदावनामधली वृंदा कोण हा लहानपणापासून पडलेला एक प्रश्न सुटला. आज आपण ह्या तुळशी-कृष्णचा विवाह समारंभ recreate करून, त्यांची Wedding Anniversary साजरी करणारे हे कळल्यावर छोट्या वऱ्हाड-मंडळींना पण एकदम ohh..झालं आणि सगळ्यांनी आनंदानी टाळ्या पिटल्या.

Google Photos Album: https://photos.app.goo.gl/3z18BQAX1Hv9jQK19






चि. सौ. कां. तुलसी म्हणजेच वृंदा म्हणजे आमची नवरी मुलगी खास काठापदराची साडी नेसून, दागिन्यांनी मढून लग्नासाठी सजून तयार झाली होती आणि कृष्णरूपी विष्णू युगायुगाची साथ देण्यासाठी अंतरपाटाच्या पलीकडे सज्ज झाला होता. ऊस मामा पण वृंदेमागून तीची पाठवणी करायला सज्ज झाले होते. वाजंत्री आणि मंगलाष्टकांच्या गजरामधे एकच गलबला झाला आणि अंतरपाट सारून वृंदा/तुळशीचं लग्न कृष्णाशी थाटामाटात पार पडलं. सर्व वऱ्हाडानी मग लाडू-चकल्या-शंकरपाळ्यावर ताव मारला आणि नवदाम्पत्याला शुभेच्छा देत एकमेकांचा निरोप घेतला.

सर्व शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचं सार्थक झालं जेंव्हा जाताना विद्यार्थी-पालक सांगत होते की पुढच्या वर्षी आपण तुळशी-कृष्णाची Anniversary परत नक्की celebrate करू.



## Canton Shala Teachers

(From Left) Bhavana Nalawade, Surekha Patil, Smita Atre,Abhijit Jogdeo, Girija Deodhar, Radhika Dravid, Madhura Damle, Rashmi Kuralkar.